ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाचे निकषात सुधारणा करण्याकरिता शासनास शिफारस करण्यासाठी समिती गठित करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांकः ग्रापापु-१००६/प्र.क्र.३७१/पापु ०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक २६ सप्टेंबर २००६**

वाचाः शासन निर्णय, पा.पु.व स्व. विभाग, क्रमांक ग्रापापु-१०९५/सीआर११२४/पापु ०७, दिनांक १८ मे, १९९६

प्रस्तावना

दिनांक २७ जुलै, २००० पूर्वी ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम **पुरवठा आधारित धोरणानुसार १००% शासकीय अनुदानातुन** राबविण्यात येत होता. त्यामध्ये पाणी पुरवठयाचे प्रमाण दरडोई दरदिवशी **५५ लिटर** गृहित धरण्यात आले होते. या धोरणा नुसार ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविण्याकरिता संदर्भात नमूद केलेल्या दिनांक १८ मे, १९९६ च्या शासन निर्णयान्वये दरडोई खर्चाचे निकष निश्चित करण्यात आले होते.

२. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी **मागणी अधारित लोकसहभागाचे धोरण** राज्यामध्ये दिनांक २७ जुलै, २००० पासून राबविण्यात येत आहे. मागणी अधारित लोकसहभागाच्या या धोरणा नुसार पाणी पुरवठयाचे प्रमाण दरडोई दरदिवशी **४० लिटर** ठरविण्यात आले आहे.

३. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या धोरणातील बदल, दरडोई दरदिवशी पाणी पुरवठयाच्या प्रमाणात झालेला बदल व मागील १० वर्षात ग्रामीण पाणी पुरवठा योजना घेण्यासाठी लागणाऱ्या खर्चात/ साहित्याच्या किमंतीत झालेली वाढ यामुळे, दिनांक १८ मे, १९९६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाचे निकष सुधारित करणे आवश्यक आहे.

४. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाचे निकषात सुधारणा करण्यासाठी शासनास शिफारस करण्यासाठी समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

(कृ.मा.प.)

शासन निर्णयः-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाचे निकष सुधारित करण्या करिता शासनास शिफारस करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठित करण्यास शासन मान्यता देत आहे:-

| | |
|---|---|
| १) सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (पापु-०७) | अध्यक्ष |
| २) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोकण विभाग | सदस्य |
| ३) विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ४) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| ५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव | सदस्य |
| ६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा | सदस्य |
| ७) कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जिल्हा परिषद, बीड | सदस्य |
| ८) कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जिल्हा परिषद, वर्धा | सदस्य |
| ९) कक्ष अधिकारी (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |

२. या समितीने पुढील बाबी विचारात घेऊन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे सुधारित निकष ठरविण्याबाबत आपल्या शिफारशी शासनास एक महिन्यात सादर कराव्यात:-

(अ) पूर्वीच्या पुरवठा आधारित धोरणामध्ये दरडोई दरदिवशी ५५ लिटर पाणी पुरवठा गृहित धरून दरडोई खर्चाचे निकष ठरविण्यात आले होते. आता सुधारित धोरणानुसार दरडोई दरदिवशी ४० लिटर पाणी पुरवठा गृहित धरून पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(ब) अंशतः हाताळलेल्या गावे/वाडयात अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या साहित्यातील वापर त्या गावे/वाडयात घ्यावयाच्या पाणी पुरवठा योजनांमध्ये होऊ शकतो. त्यामुळे, न हाताळलेल्या **(एनसी)** व अंशतः हाताळलेल्या **(पीसी)** गावे/वाडयात पाणी पुरवठा योजना घेण्यासाठी वेगवेगळे दरडोई खर्चाचे निकष असावेत का?

(क) १९९६ ते २००६ या काळात ग्रामीण पाणी पुरवठा योजना घेण्यासाठी लागणारे साहित्य व योजनेसाठी लावाव्या लागणाऱ्या मजूरांच्या मजूरीत झालेली वाढ.

(ड) दरडोई खर्चाचे निकष ठरविण्यासाठी समितीला आवश्यक वाटतील अशा इतर बाबी सु[illegible] विचारात घ्याव्यात.

३. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०९२६१७२३०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुधाकर ज्ञा. बोबडे)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**



D:\New Folder\cost norms committee.doc

प्रत,

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव (ग्राम विकास व पंचायत राज ), ग्रा.वि.व ज.सं.वि., मंत्रालय, मुंबई
सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (पापु-०७)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोकण विभाग
विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (इतर सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जिल्हा परिषद, बीड
कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जिल्हा परिषद, वर्धा
कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जिल्हा परिषद, (इतर सर्व)
संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती